| | |
|---|---|
| MHSN060009292024 | Miraj City Police Station<br>PWDVA Appln./31/2024<br>Rupali Babaso Sakate Vs. Sachin Babaso Sakate |

## निशाणी ४८ वरील आदेश

प्रस्तुत प्रकरणातील जाबदार यांनी निशाणी ५ कडील अंतरिम पोटगी अर्जास युक्तीवाद करणेकामी एक महिन्याची मुदत मिळणेकरीता मुदतीचा अर्ज दाखल केला आहे.

२. जाबदारतर्फे वकिल श्री. आय. बी. पालेगार आणि अर्जदारतर्फे श्री. एस. एस. वाटवे यांचा युक्तीवाद ऐकला.

२. यातील जाबदारतर्फे वकिलांनी युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणामध्ये जाबदार यांनी निशाणी ३६ प्रमाणे साक्षीसमन्स काढणेसाठी दिलेला अर्ज न्यायालयाने नामंजूर केला असून सदर आदेशाविरुध्द जाबदार हे अपील दाखल करणार आहेत. त्याचप्रमाणे पुढे युक्तीवाद केला की, सदर निशाणी ३६ प्रमाणे मागणी केलेली कागदपत्रे ही अंतरिम अर्जाच्या चौकशीकामी अत्यंत आवश्यक अशी असल्याने जाबदार हे सदर आदेशाविरुध्द अपील दाखल करणार आहेत. त्यामुळे सदर प्रकरणात अंतरिम अर्जाच्या युक्तीवादाकरीता एका महिन्याची मुदत द्यावी अशी विनंती केली आहे.

३. याऊलट अर्जदारतर्फे वकिलांनी तोंडी हरकत घेतली व जाबदार यांचा अर्ज हा केवळ प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या उद्देशाने दाखल केला असून तो सकृतदर्शनी नामंजूर होणेस पात्र असल्याचे कथन केले आहे. तसेच प्रस्तुतचे प्रकरण हे निशाणी ५ अंतरिम अर्जाच्या आदेशाकरीता प्रलंबित असून जाबदार यांनी पुरेशी आणि बरीचशी अशी संधी

देण्यात आलेली आहे. तसेच सदरच्या अर्जास कोणतेही कारण घडलेले नसून यातील अर्जदार व जाबदारतर्फे वकिलांनी निशाणी ५ अंतरिम अर्जावर दिनांक ०३.०५.२०२५ रोजी आपला युक्तीवाद सादर केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या प्रकरणात यातील अर्जदार आणि जाबदारतर्फे वकिलांनी निशाणी ५ अंतरिम अर्जावर दिनांक ०३.०५.२०२५ रोजी युक्तीवाद केलेला आहे. त्यानंतर जाबदारतर्फे निशाणी ३४ व ३६ हे अर्ज प्रस्तुतचे प्रकरण हे निशाणी ५ आणि निशाणी १५ आदेशावर प्रलंबित असताना दिलेले होते. सदरचे प्रकरणात दिनांक ०३.११.२०२५ रोजी निशाणी १५, निशाणी ३४ आणि निशाणी ३६ या अर्जांवर आदेश पारीत केलेले आहेत. त्याचप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण हे निशाणी ५ आदेशाकरीता ब–याच तारखांपासून प्रलंबित आहे. यातील जाबदारतर्फे पुन्हा निशाणी ५ युक्तीवादाकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणात यापूर्वीच निशाणी ५ अंतरिम अर्जावर पुर्णतः असा युक्तीवाद झालेला आहे. यातील जाबदार यास निशाणी ३६ खाली झालेल्या आदेशावर अपील करण्याची संधी आहे. परंतु केवळ त्या कारणाकरीता पुन्हा प्रस्तुतचे प्रकरण हे निशाणी ५ युक्तीवादाकरीता नेमणे योग्य नाही व तसे कोणतेही कारण नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

जाबदार यांचा मुदतीचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

ANIRUDHA SUNIL RANE

Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

ठिकाण –मिरज.
दिनांक –०६.११.२०२५.

(अनिरुध्द एस. राणे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज